आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
४ सप्टेंबर २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- भारताबरोबर सागरी सहकार्य वाढवण्याचं बेल्जियमचे प्रधानमंत्री बार्ट दे वीव्हर यांचं आश्वासन

- लोकसहभागातून, डीजेमुक्त पद्धतीनं सण उत्सव साजरे व्हावे हा राज्य सरकारचा उद्देश असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- ब्रिक्स देशांच्या सरन्यायाधीशांच्या परिषदेला आजपासून नवी दिल्लीत सुरुवात

आणि

- सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी चायना मास्टर्स सुपर 750 बॅडमिंटन स्पर्धेच्या उपान्त्य फेरीत

<><><><><>

भारत आणि बेल्जियम यांच्यात सागरी क्षेत्रातलं सहकार्य वाढवण्याचं आश्वासन बेल्जियमचे प्रधानमंत्री बार्ट दे वीव्हर यांनी दिलं आहे. त्यासाठी पुढच्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात सागरी आणि बंदर क्षेत्राचं पूर्ण प्रतिनिधीमंडळ घेऊन भारतात येऊ, आणि या क्षेत्रात प्रत्यक्ष काम करायच्या दिशेनं पावलं उचलू, असं ते म्हणाले. भारत-युरोपीय महासंघ मुक्त व्यापार कराराबाबत आज मुंबईत झालेल्या भारत-बेल्जियम उच्चस्तरीय चर्चेला ते संबोधित करत होते.

भारत आणि बेल्जियम यांच्यातला द्विपक्षीय व्यापार दुप्पट करायच्या प्रवासात महाराष्ट्र एक अतिशय महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या कार्यक्रमात बोलताना व्यक्त केला. बेल्जियम आणि महाराष्ट्र यांच्यात काही ठराविक प्रकल्प ठरवून त्यांची जलद अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने एक पथक स्थापन करण्याचा प्रस्ताव त्यांनी मांडला.

हिरे आणि अलंकार, सेमीकंडक्टर, हरित हायड्रोजन आणि बंदरं, संरक्षण आणि आधुनिक उत्पादन आणि शेती आणि अन्नप्रक्रिया अशा एकंदर 5 क्षेत्रांमध्ये बेल्जियम आणि भारत या 2 देशांच्या अर्थव्यवस्था एकमेकांना पूरक आहेत, असं मत केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी यावेळी मांडलं.

विविध कंपन्यांचे प्रतिनिधी, राजनैतिक अधिकारी आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

ध्वनीप्रदुषण कमी करुन पारंपारिक पद्धतीनं सण साजरे करणं हाच सरकार आणि प्रशासनाचा उद्देश आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज पुण्यात वार्ताहरांशी बोलताना स्पष्ट केलं. डीजे बंदीच्या मुद्द्यावर वार्ताहरांनी विचारलेल्या प्रश्नावर ते बोलत होते. लोकांना विश्वासात घेऊन त्यातून मार्ग काढणं अधिक गरजेचं आहे. त्यामुळं विविध जिल्ह्यांमध्ये पोलीस आणि प्रशासन आधी नागरिकांशी चर्चा करत असून त्यानंतर आदेश काढले जात असल्याचं ते म्हणाले.

**- - होल्ड - मुख्यमंत्री बाइट - - -**

**- <><><><><>**

सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाखेरीज इतर न्यायालयातल्या न्यायाधीशांचं सेवानिवृत्तीचं वय ६० वरुन ६२ वर्षे करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश देशातल्या ७ राज्यांनी मान्य केले आहेत. त्यात छत्तीसगढ, कर्नाटक, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, सिक्कीम, तमिळनाडू, आणि पश्चिम बंगालचा समावेश आहे. त्यानुसार या राज्यात यंदा ३१ मार्च रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या न्यायाधीशांना, त्यांनी इतरत्र सेवा स्वीकरली नसल्यास पुन्हा पदावर रुजू होण्याची संधी दिली जाईल, तसंच नियमात आवश्यक सुधारणा होईपर्यंत कोणत्याही न्यायाधीशाला वयाची ६२ वर्ष पूर्ण करण्याच्या आत सेवानिवृत्त केलं जाणार नाही. हा निर्णय सर्व प्रकारची न्यायालयं, न्यायधिकरणं, आणि अर्धन्यायिक आस्थापनांना लागू होईल. सर्वोच्च न्यायालयातल्या न्यायाधीशांसाठी सेवानिवृत्तीचं वय ६५ वर्ष असून उच्च न्यायालयातले न्यायाधीश ६२व्या वर्षी निवृत्त होतात. इतर राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांनीही या मुद्द्याचा फेरविचार करुन येत्या २ आठवड्यात जबाब द्यावा असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही एस मोहना यांच्या पीठानं सांगितलं.

**<><><><><>**

नवी दिल्ली इथे आजपासून ब्रिक्स सरन्यायाधीश परिषदेला सुरुवात झाली. या मंचावर ब्रिक्सच्या सदस्य देशांमधले सरन्यायाधीश, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश तसंच विधिज्ञ सहभागी झाले आहेत. भारताचं सर्वोच्च न्यायालय या मंचाचं यजमानपद भूषवत आहे.

भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी आज रशिया, चीन, इजिप्त, इंडोनेशिया, संयुक्त अरब अमिराती, बेलारूस, कझाकस्तान, दक्षिण आफ्रिका, इराण आणि उझबेकिस्तान इथल्या न्यायिक शिष्टमंडळांच्या प्रमुखांशी बैठका घेतल्या. या बैठकांमध्ये विविध देशांमधलं न्यायिक सहकार्य बळकट करणं, न्यायव्यवस्थेची कार्यक्षमता वाढवण्यासाठी तंत्रज्ञानाचा अवलंब करणं, जलद न्यायिक प्रक्रियेद्वारे लोकांचे परस्पर संबंध सुधारणं आणि विविध देशांमधील सर्वोत्तम कायदेशीर पद्धती यांवर चर्चा करण्यात आली.

**<><><><><>**

सीबीआयने देशभरातल्या तीन महत्वाच्या डिजिटल अरेस्ट प्रकरणांचा छडा लावत तीन जणांना अटक केली आहे. डिजिटल अरेस्टच्या या प्रकरणांमधल्या दुव्यांनुसार देशभरातल्या २० राज्यांमध्ये ८९ ठिकाणी सीबीआयने छापे टाकले होते. यातून मिळालेल्या मााहितीनुसार राजस्थानातले दोन जण आणि गुजरातमधल्या एकाला अटक केली आहे. राजस्थानमधल्या दोन आरोपींनी डिजिटल अरेस्ट प्रकरणात ७ कोटी६७ लाख आणि १५ कोटी ४५ लाखांची फसवणूक केली आहे तर गुजरातमधल्या आरोपीने १९ कोटी २४ लाख रुपयांची फसवणूक केली आहे.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरमधे बडगाम जिल्ह्यातल्या 'अशदार गली' भागात आज सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत एक दहशतवादी ठार झाला. या भागात दहशतवादी असल्याची माहिती मिळाल्यानं लष्कर, जम्मू-काश्मीर पोलीस आणि सीआरपीएफ यांनी ही संयुक्त मोहीम राबवली. शोधमोहिम सुरु असताना तिथं लपून बसलेल्या दहशतवाद्यानं सुरक्षा दलांवर गोळीबार केला, त्यामुळे चकमक सुरू झाली. त्यात हा दहशतवादी मारला गेला. त्याच्याकडची 'एके' रायफल आणि इतर साहित्य जप्त करण्यात आलं.

**<><><><><>**

सेबीनं NSE अर्थात राष्ट्रीय शेअर बाजाराच्या IPO ला आज मंजुरी दिली. जून महिन्यात NSE ने यासाठी अर्ज केला होता. यातून NSE ३० हजार कोटी रुपये उभे करणार आहे आणि हा देशातला सर्वात मोठा IPO ठरेल. यापूर्वी ह्युंदाईनं बाजारातून सुमारे २८ हजार कोटी आणि एलआयसीनं साडे २० हजार कोटी रुपये उभे केले होते. IPOचे बाजारमूल्य, समभागांची किंमत आणि इतर माहिती पुढच्या आठवड्यात जाहीर केली जाण्याची शक्यता

आहे. १५ सप्टेंबरपासून NSE च्या आयपीओसाठी अर्ज करता येतील आणि २५ तारखेपूर्वी या समभागांची शेअर बाजारात नोंदणी होईल, अशी चर्चा आहे.

<><><><><>

इटालियन प्रजासत्ताकाच्या इतिहासात सर्वाधिक काळ सत्तेवर राहणारे सरकार म्हणून विक्रम प्रस्थापित केल्याबद्दल इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज अभिनंदन केलं, तसंच त्यांना शुभेच्छाही दिल्या. त्याबद्दल जॉर्जिया मेलोनी यांनी मोदी यांचे आभार मानले आहेत.

<><><><><>

भारतीय बॅडमिंटनपटू  सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी शेन्झेन इथं सुरू असलेल्या 'चायना मास्टर्स सुपर 750' बॅडमिंटन स्पर्धेच्या उपान्त्य फेरीत प्रवेश केला आहे.  डेन्मार्कच्या  किम अॅस्ट्रिप आणि अँडर्स स्कारूप रासमुसेन या जोडीवर त्यांनी २१-१३**, १६-२१, २१-१८**  अशी मात केली.

पुरुष एकेरीत हाँगकाँगच्या ली च्युक यु कडून  १६-२१, १६-२१ अशी हार झाल्याने भारताच्या किदंबी श्रीकांतचं स्पर्धेच्या उपउपान्त्य फेरीतलं आव्हान संपुष्टात आलं आहे.

<><><><><>

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी न्यूयॉर्कमध्ये जागतिक कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. या चर्चेत भारताच्या वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेत डिजिटल पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात निर्माण होत असलेल्या नवीन गुंतवणुकीच्या संधींवर भर देण्यात आला. अलिकडच्या अर्थसंकल्पांमुळे डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये वाढ झाली असून कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल सेवा, क्लाउड कॉम्प्युटिंग यांसारख्या क्षेत्रात वेगाने प्रगती होत असल्याचं त्या म्हणाल्या.

//<><><><><>//